क्रमांक : एलएनडी-२६८६/१८०८३४/प्र.क्र.१०२९/ग३

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक ३० मार्च, १९९४

विषय:- जमीन : मुंबई उपनगर जिल्हा
मौजे ट्रॉम्बे न.भू.क्र.१ व २ पैकी जमीन
मुंबई महानगरपालिकेस जकात नाक्यासाठी
देण्याबाबत

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांच्या क्र.सी/कार्या-२/रबी/३४/एफ-०२७, दिनांक १३.७.१९९२ व क्र.सी/कार्या-रबी/३४/जे-७३, दिनांक १.२.१९९३ च्या पत्रास अनुलक्षून विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्याचा मला निदेश आहे की, मुंबई-पनवेल रोड पैकी मुंबई महानगरपालिकेस दिलेल्या ३६९५३.२० चौ.मी. जमिनीपैकी २१२०६.२० चौ.मी. क्षेत्र महानगरपालिकेकडून परत घेण्यात आले आहे. महानगरपालिकेच्या ताब्यात असलेले उर्वरित क्षेत्र कार्य-विस्ताराच्या मानाने अपुरे पडत आहे. त्यामुळे मौजे ट्रॉम्बे येथील न.भू.क्र.१ व २ पैकी "ना विकास क्षेत्रातील" १५०००चौ.मी. जमीन/तसेच मंजूर सुधारित विकास योजनेत "निर्यात कार्यालयासाठी" आरक्षित असलेली २०००चौ.मी. जमीन जकात नाक्यासाठी मिळणेबाबत विनंती महानगरपालिकेने केली आहे. महानगरपालिकेने केलेली विनंती विचारात घेऊन शासन आता मौजे ट्रॉम्बे न.भू.क्र.१ व २ पैकी उपरोक्त जमीन जकात नाक्यासाठी पुढील अटी/शर्तींवर मंजूर करीत आहे:-

१) महानगरपालिकेस "ना विकास क्षेत्रातील" मंजूर केलेल्या जमिनीपैकी जकात नाक्याच्या उपयोगासाठी कमीत कमी जागेचा उपयोग आवश्यक तेवढयाच बांधकामासाठी करावा व उर्वरित क्षेत्र पूर्णपणे मोकळे ठेवावे.

२) महानगरपालिकेस मंजूर केलेल्या जमिनींसाठी शासन परिपत्रक, क्र. एलएनडी-१०८३/२७०२/प्र.क्र.१९०९/ग५, दिनांक ४.२.१९८३ मधील तरतुदीनुसार "नाविकास क्षेत्रातील" १५०००चौ.मी. जमिनीसाठी शिघ्र सिध्द गणकानुसार होणारे रु.९३२/- प्रति चौ.मी. इतके तात्पुरते मुल्यांकन आधारभूत धरुन कब्जेहक्काची किंमत आकारण्यात यावी. तर मंजूर विकास योजनेत "निर्यात कार्यालयासाठी"

.....२/-

आरक्षित असलेले २०००चौ. मी. क्षेत्र जमिनीचे ,प्रारूप
सुधारित विकास योजना प्रसिध्द झालेल्या दिनांकास
म्हणजेच दिनांक ३०.४.१९९४ रोजी असलेले बाजार
भावाचे मूल्य आधारभूत धरून दस्तऐवजाची किंमत
आकारण्यात यावी.

३) प्रस्तुत जमिनीची अंतिम किंमत नगर रचना
व मूल्यनिर्धारण विभागाकडून निर्धारित करून घ्यावी
व तात्पुरत्या व अंतिम मुल्यांकनाच्या फरकाच्या
रकमेवर प्रचलित दराने व्याज आकारण्यात यावे.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने [अनौपचारिक संदर्भ क्रमांक मोआर-१२५१ /९३/व्यय-९, दिनांक ९.११.१९९३] निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[द. शि. फाटक]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
बी. एम. आर. डी. ए. इमारत,
वान्द्रे[पू]मुंबई-४०००५१

प्रतिलिपी माहितीसाठी सादर.
१] आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२] जमाबंदी आयुक्त व संचालक , भूमि अभिलेख, मुंबई
३] उपसंचालक, भूमि अभिलेख, मुंबई
४] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५] महालेखापाल,[लेखा व अनुज्ञेयता]महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
६] सहायक संचालक नगर रचना, व मूल्यनिर्धारण , मुंबई
७] नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८] वित्त विभाग[व्यय-९]
९] महसूल व वन विभाग ल३ कार्यासन, [निवड नस्तीकरीता]

Scanned by CamScanner